जनसंपर्क कक्ष
09 AUG 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित यशस्वी विद्यार्थ्यांबरोबर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. जगन कराडे आदी.

# शिवाजी विद्यापीठातील केंद्रामुळेच स्पर्धा परीक्षेत यश

- यशस्वी विद्यार्थ्यांच्या भावना
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

स्पर्धा परीक्षेतील यशामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शन केंद्राचे, ग्रंथालयाचे मोलाचे योगदान आहे, अशी कृतज्ञतेची भावना राज्यसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांत यश प्राप्त केलेल्या उमेदवारांनी व्यक्त केली.

दोन वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी प्रतीक लंबे यांनी एमपीएससीद्वारे सहाय्यक कक्ष अधिकारी व राज्य कर निरीक्षक आणि राज्यसेवेद्वारे सहाय्यक आयुक्त (महानगरपालिका, मुख्याधिकारी), प्रिया काटकर यांनी एमपीएससीद्वारे राज्य कर निरीक्षक आणि राज्यसेवेद्वारे कामगार अधिकारी, अजिंक्य इंगवले यांनी सहाय्यक निबंधक (सहकार) (राज्यसेवा), सौरभ साळुंखे यांनी पोलीस उपनिरीक्षक (एमपीएससी), प्रशांत श्रृंगारे यांनी पोलीस उपनिरीक्षक व मंत्रालय क्लार्क (एमपीएससी), रजत खोपडे यांनी मंत्रालय क्लार्क (एमपीएससी), धनश्री मौर्य यांनी न्यायालय क्लार्क (मुंबई उच्च न्यायालय), श्रीधर गुरव यांनी राज्य कर निरीक्षक (एमपीएससी) आणि स्नेहा मोरे यांनी सहाय्यक शाखा पोस्टमास्टर (भारतीय पोस्ट) यांनी यश प्राप्त केले आहे. केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश कांबळे यांनी स्वागत केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

0 9 AUG 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बापूजी साळुंखे यांच्या तत्त्वज्ञानात परंपरा, नवतेचा संगम : प्रा. डॉ. शिंदे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शिक्षण क्षेत्रात योगदान मोलाचे असून, त्यांच्या तत्त्वज्ञानात परंपरा, नवतेचा संगम होता. आजच्या काळात माणूस व यंत्र यांच्यात संघर्ष निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांना बहुज्ञानशाखीय शिक्षणाला सामोरे जावे लागणार आहे. अस्वस्थ वर्तमान काळात बापूजींच्या विचारांचे स्मरण, अंगीकार महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व आजचे शिक्षण' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष लालासाहेब यादव, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी, चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आले. दुपारच्या सत्रात संस्थेतील मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्र झाले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. कविता तिवडे व प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. सिताराम गवळी यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानप्रसंगी समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे आदी.**

लोकमत



डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजमध्ये प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांचे व्याख्यान झाले. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत बापूजींचे मोलाचे योगदान

## शिंदे : डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे. बापूजींचे द्रष्टेपण त्यांनी खेड्यापाड्यांत निर्माण केलेल्या संकुलांमधून दिसते. शिवाजी विद्यापीठाच्या निर्मितीमध्ये बापूजींची महत्त्वाची भूमिका होती, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख, प्रसिद्ध समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी मंगळवारी केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त 'डॉ. बापूजी साळुंखे आणि आजचे शिक्षण' या विषयावर विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

### शिक्षकांनी सजग असणे गरजेचे

प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, येऊ घातलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना शिक्षकांनी सजग असणे गरजेचे आहे. तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर स्वार होण्याचे आव्हान शिक्षकांनी स्वीकारले पाहिजे.

यावेळी उपाध्यक्ष लालासाहेब यादव, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, सीताराम गवळी, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित होते. दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत व जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविले. यावेळी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती विशेषांकाचे प्रकाशन झाले. महेश हिरेमठ, त्यांच्या सहकाऱ्यांनी भक्तिगीते सादर केली.

लोकमत

# शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रमाणपत्रांचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महावीर एज्युकेशन सोसायटी व ललित गांधी फाउंडेशनतर्फे चालविण्यात येणाऱ्या शिवाजी विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाची १६ वी बॅच व ललित गांधी फाउंडेशनच्या डिप्लोमा कोर्स फॉर प्री-प्रायमरी टीचर्सच्या १४ व्या बॅचच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम तरुणींना शिक्षण क्षेत्रात करिअरसाठी अत्यंत उपयुक्त व महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम असल्याचे प्रतिपादन महावीर एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका मुक्ती ललित गांधी यांनी केले.

यावेळी मुख्याध्यापिका धनश्री व्हनागडे, मुख्याध्यापिका नीलम जाधव, विद्या सरमळकर आदी उपस्थित होते. सलग १६ वर्षे शंभर टक्के निकालाची व शंभर टक्के नोकरीची परंपरा जपल्याबद्दल गांधी यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. मृण्मयी चौगुले यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
09 AUG 2023
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ पुनर्प्रवेश परीक्षेला ४३३ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी २१ अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या. परीक्षेला नोंदणी केलेल्या ४७९ पैकी ४३३ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या वतीने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध अधिविभागांत पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने झाली. यात एमएस्सी. केमेस्ट्री (ॲनालिटिकल, फिजिकल, ऑर्गेनिक, इंडस्ट्रीयल, अप्लाईड), एमएस्सी. बॉटनी, झुलॉजी, इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर सायन्स, इन्व्हायरमेंटल सायन्स, एमएस्सी. मायक्रोबायलॉजी, एमए., एमएस्सी. (भूगोल), एमएस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, बीएस्सी., एमएस्सी. (अर्थशास्त्र), बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एमए (योगाशास्त्र) अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षांचा समावेश होता.

09 AUG 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची १९ रोजी प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची १९ ऑगस्ट रोजी प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली योजनेंतर्गत एस.सी., एस.टी., ओबीसी, ई.डब्ल्यू.एस. व अल्पसंख्याक व खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. अर्ज व परीक्षा सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www. unishivaji. ac. in) यूजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्सवर उपलब्ध आहेत. प्रवेश परीक्षा अर्ज केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध असून, १४ ऑगस्टपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रांसहित केंद्राच्या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन संचालक डॉ. प्रकाश कांबळे यांनी केले आहे.

पुढारी

# उन्हाळी सत्रातील ६१८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ६१८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. विद्यापीठातर्फे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्ष), बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला १,५९४ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. ८ बी.फार्मसी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. भरारी पथकाकडून सातारा जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. ८ : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेअंतर्गत एस.सी, एस.टी, ओबीसी, ई.डब्ल्यू. एस (नॉन क्रिमिलेअर), अल्पसंख्याक आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे १९ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता प्रवेश परीक्षा होणार आहे. सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) 'युजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्स' वर उपलब्ध आहे.

सकाळ

# विद्यापीठात ४३३ विद्यार्थ्यांनी दिली ऑफलाईन पुनर्प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमधील विविध पदव्युत्तर २१ अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्प्रवेश परीक्षा मंगळवारी ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आली.

विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीमध्ये घेतलेल्या या परीक्षेसाठी ४७९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४३३ जणांनी परीक्षा दिली असून ४६ जण अनुपस्थित राहिले. दरम्यान, बॅचलर ऑफ लॉ (फाईव्ह ईअर), बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल) या विषयांची परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी १५९४ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या कालावधीत सातारा जिल्ह्यात कॉपी करताना एका विद्यार्थ्याला भरारी पथकाने पकडले. परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे बी. फार्मसी (सत्र ३ आणि ४) अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ रिएन्ट्रन्स परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मंगळवारी २१ अभ्यासक्रमांच्या रिएन्ट्रन्स परीक्षा सुरळीत पार पडली. परीक्षेला ४७९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४३३ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाच्यावतीने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची रिएन्ट्रन्स परीक्षा ऑफलाईन पद्धतीने झाली. एमएस्सी. केमेस्ट्री (ॲनालिटिकल, फिजीकल, ऑर्गेनिक, इंडस्ट्रीयल, अप्लाईड), एमएस्सी. बॉटनी, झूलॉजी, इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर सायन्स, इन्व्हायरमेंटल सायन्स, एमएस्सी. मायक्रोबायलॉजी, एमए., एमएस्सी. (भूगोल), एमएस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, बीएस्सी., एमएस्सी. (अर्थशास्त्र), बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, वायसीएसआरडी (एमबीए, एमएसडब्ल्यू, एम.टेक.) एमए (योगाशास्त्र) आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

तरुण भारत

# स्पर्धा परीक्षा केंद्राची १९ ऑगस्ट रोजी प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : पदवीप्राप्त आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आहे. येथे एस.सी, एस.टी, ओबीसी, ई.डब्ल्यू.एस (नॉन क्रिमीलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता २०२३-२०२४ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश दिले जाणार आहेत. त्यासाठी परीक्षा अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविले आहेत. हा अर्ज व परीक्षा सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर युजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्स वर उपलब्ध आहेत.